| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**<br>**विभागीय मंडळ, पुणे. ४११००५**<br>**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005** | |

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


क्र.पु.वि.मं./डी.पी./ 6937
पुणे. 411005.
दि. 21/8/2025

प्रति,

मुख्याध्यापक व प्राचार्य
सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर

**विषय :- माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी School / College Profile भरणेबाबत...**
**संदर्भ - राज्यमंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-3/2546 दि. 15/07/2025 चे पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, फेब्रवारी-मार्च 2026 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. 10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यापुर्वी सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांची माहिती School / College Profile भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्याकरिता School Profile / College Profile ही लिंक मंडळाची वेबसाईट www.mahahsscboard.in वर दि. 15/07/2025 पासून सुरु करण्यात आली आहे. तरी सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांची Profile मुदतीपुर्वी भरून घ्यावी.

Profile भरण्याबाबतच्या महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे.

1. Profile मध्ये शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची संपूर्ण माहिती, संस्थेची माहिती, मान्यताप्राप्त विषय व विद्यार्थ्यांची माहिती अचूक भरावी.
2. UDISE Code योग्य असल्याची खातरजमा करण्यात यावी. त्यात बदल असल्यास विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.
3. मुख्याध्यापक / प्राचार्य यांचा Mobile अथवा E-mail ID यामध्ये बदल करावयाचा असल्यास मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या लॉगिन मधून खालीलप्रमाणे Process करावी.
   मुख्याध्यापक / प्राचार्य लॉगिन > Master > User > Headmaster / Principal > यामध्ये जावून Edit केल्यानंतर Update करावे.
4. मुख्याध्यापक / प्राचार्य यांचा Mobile अथवा E-mail ID यामध्ये बदल न झाल्यास विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

**(कैलास दातखीळ)**
**विभागीय सचिव,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे-05.**